**नियमित दिवाणी दावा नं. १९/२०२०**

**निशाणी क्रमांक ४९ वरील आदेश**

**सी.एन.आर.क्र. MHK0110002432020**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ११ नियम १४ अन्वये प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ४८ चे दुरूस्ती अर्जामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे दिनांक ११/०१/१९८८ रोजीचे प्रस्तुत दावेतील व खरेदीपत्रातील तोंडी वाटपाचे लेखी स्मरण वाटणीचा लेख हजर करणेबाबत आदेश होणेकरिता दाखल केलेला आहे.

**०२.** प्रस्तुत अर्जाद्वारे वादी यांचे असे कथन आहे की, निशाणी क्र. ४८ कडे प्रतिवादी यांनी प्रतिदावा दुरूस्त करणेकरिता अर्ज दाखल केला असून प्रस्तुत अर्जामध्ये प्रतिवादी यांनी दिनांक ११/०१/१९८८ रोजीचे वाटणीपत्राचा उल्लेख केलेला आहे. तथाकथीत वाटणीपत्र प्रतिवादी यांनी हजर केलेले नाही. सदर वाटणीपत्र हे प्रतिवादी यांचे ताब्यात आहे. सदर वाटणीपत्राची मुळ प्रत अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सबब, दिनांक ११/०१/१९८८ रोजीचे वाटणीपत्राची मुळ प्रत दाव्याकामी हजर करणेबाबत दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम ११ नियम १४ अन्वये प्रतिवादी यांना आदेश करण्यात यावे अशी वादी यांनी विनंती केली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ५२ येथे म्हणणे दाखल करून प्रस्तुत अर्जास तिव्र विरोध केला. प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे वादी यांनी निशाणी क्र. ३/४ कडे दाखल दिनांक ०३/०३/२००९ रोजीचे नोंदणीकृत दस्त क्र. १२८६/२००९ यामध्ये दिनांक ११/०१/१९८८ रोजीच्या तोंडी वाटपाबाबतचा उल्लेख केलेला आहे. सदरचा वाटणीचा दस्त हा वादी यांचे ताब्यात असून तो त्यांच्याकडे उपलब्ध आहे. सदरचा अर्ज हा विहीत नमुन्यात नाही. सदरचा दावा हा मनाईचा आहे. अद्याप दाव्याची चौकशी सुरू झालेली नाही. त्यामुळे सदरचा

दस्त दाखल करण्याची आवश्यकता नाही. उपरोक्त कागदपत्राची प्रत ही वादीकडे व मयत बनाबाई यांचेकडे होती. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

**०४.** प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील प्रतिवादी यांचे म्हणणे याचे अवलोकन केले. वादीतर्फे व प्रतिवादीतर्फे सन्माननिय विधीज्ञ यांचा सखोल युक्तीवाद ऐकला.

**०५.** प्रस्तुत अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वादी यांनी निरंतर मनाई करिता दाखल केलेला असून प्रस्तुत दाव्याकामी प्रतिवादी यांनी हजर होऊन त्यांची कैफियत दाखल करून वादी यांचा सदरचा दावा नाकारलेला आहे. यातील प्रतिवादी यांनी निशाणी क्र. ४८ कडे अर्ज देऊन प्रतिदावा दुरूस्त करण्याची मागणी केली आहे. त्यामध्ये त्यांनी दिनांक ११/०१/१९८८ रोजीच्या वाटणीपत्राचा उल्लेख केलेला आहे. प्रतिवादी यांनी सदरचा दावा हा मनाईचा असून अर्ज हा विहीत नमुन्यात नसल्याचे त्याचबरोबर अद्याप दाव्याची चौकशी सुरू झालेली नसल्याचे कथन करत सदरचा दस्त दाखल करण्याची आवश्यकता नाही असे कथन केलेले आहे. अर्ज, म्हणणे व दाव्याचे स्वरूप पाहता प्रतिवादी यांनी नमुद केलेल्या तांत्रिक हरकती लक्षात घेणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व वाजवी होणार नाही. म्हणूण सदरचा अर्ज हा मंजूर करण्यात येत आहे.

**सही/-**

**( एस. डी. सोनवणे )**

**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ-वडगांव.**

**पेठ-वडगांव.**

**दिनांक ०१/०१/२०२४**